शपथेवर सुरु
सरकारतर्फे साक्षीदार क्र. २ चा सरतपासः-

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - पो.ना/२१२७ तुकाराम भिमराव खेडकर,
वयः - ४० वर्षे,
नेमणुक. - पोलिस मुख्यालय अहिल्यानगर, जि.अ.नगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. के. सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

दि. २१/०८/२०२३ रोजी मी नेवासा पोलिस स्टेशन अंतर्गत कुकाणा येथे पो.ना. या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी गु.र.क्र.८५९/२०२३ चा तपास माझ्याकडे आला होता. आदेश, फिर्याद, दैनिक अहवाल व तपास आदेश तपासाकामी देण्यात आला होता. आता मला सदरचा तपास आदेश दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यावर ठाणे अंमलदार धोत्रे यांची सही आहे. ते माझे सहकारी असल्याने मी त्यांची सही ओळखतो. त्यातील संपूर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी २० देण्यात येते.

२. कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. सदर घटना ठिकाण हे देडगाव ते जेऊर जाणा-या रोडवर तिरमली वस्ती जवळील डांबरी रोडवर होते. आता मला निशाणी १३ वरील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचाच्या सह्या असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

३. साक्षीदारांचे जबाब नोंदवले. आरोपीस फौ.प्र.सं. कलम ४१(अ) ची नोटीस दिली. आता मला सदर नोटीस दाखविण्यात आली. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी २१ देण्यात येते. आरोपीस त्याची गाडी ताब्यात घेण्यासाठी नोटीस दिली व गाडी ताब्यात घेतली. ताब्यात घेतली बाबतचा ताबा पंचनामा केला. आता मला निशाणी १४ वरील ताबा पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचाच्या सह्या असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

४. वाहनाची तांत्रीक तपासणी करणेकामी ए.एस. ॲटो गॅलेज, कुकाणा यांना पत्र दिले. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी २२ देण्यात येते. अहवाल प्राप्त करून मुळ कागदपत्रात सामिल केला. आरोपीस गाडी बॉन्डवर परत केली. आता मला अपघात ग्रस्त वाहन क्र. एम.एच.१२ ए.पी. ५८८२ चा सुपुर्तनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी व मुळ मालकाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी २३ देण्यात येते.

आता मला अपघात ग्रस्त वाहन क्र. एम.एच.१७ सी.एल ९३९५ चा सुपुर्तनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी व मुळ मालकाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी २४ देण्यात येते. गाडीचे मुळ कागदपत्र हस्तगत करून दोषारोपपत्रात सामिल केले.

५. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेकामी साईदिप हॉस्पीटल, अहमदनगर यांना पत्र दिले. आता मला पत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी २५ देण्यात येते. वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर दोषारोपपत्रात सामिल केले. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ एस.एस. शिंदे यांचेमार्फत सुरू-

६. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाचा चतु:सिमा मला सांगता येणार नाही. घटनाच्या स्थळाच्या दक्षिणेला देडगाव, उत्तरेला कुकाणा रोड, पुर्वेस इनामदार यांची शेती व पश्चीमेला म्हस्के यांचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनास्थळाची चतु:सिमा माहित नसताना मी चुकिच्या सांगितल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे जबाब घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गाडी ताब्यात घेते वेळी मी कोणतीही नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, नोटीस दिली हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, नोटीसची प्रत मी दोषारोपपत्रासह दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गाडी मी बेकायदेशीरपणे ताब्यात घेतली. हे म्हणणे खरे नाही की, गाडी ताब्यात घेतेवेळी कोण पंच होते याची नावे मला सांगता येत नाही. गाडी ताब्यात घेतेवेळी पंच बाळासाहेब सावंत व अभिजित देशमुख हे उपस्थित होते. हे म्हणणे खरे नाही की, पंचसोबत होते हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर केस संदर्भात मी कोणतीही शहानिशा केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तपास न करता खोटे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा

दिनांक-१७/०३/२०२६.